


परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता



https://www.parlisangharshneta.in
9881265102
संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 188 | मंगळवार दि. 22 जुलै 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


## कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंचा राजीनामा? सुनील तटकरेंचं सूचक विधान





महाराष्ट्राचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा एक व्हिडीओ राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी पोस्ट केला होता. या व्हिडीओत ते रमी खेळताना दिसत होते. सभागृहात माणिकराव कोकाटे असतानाचा हा व्हिडीओ आहे. दरम्यान यावरुन माणिकराव कोकाटेंवर टीकेची झोड उठली. त्यानंतर मी रमी खेळत नव्हतो तर जाहिरात स्कीप करत होतो असं स्पष्टीकरण माणिकराव कोकाटेंनी दिलं. तरीही त्यांच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याबाबत महत्त्वाचं विधान केलं आहे. तसंच सूरज चव्हाण यांच्याबाबतही भूमिका मांडली. मी विधानपरिषदेत कामकाजासाठी बसलो होतो. तेव्हा सभागृह काही वेळासाठी तहकूब झाले असावे. म्हणून मी खालच्या

पान 3 वर

## 209 जणांचा मृत्यू पण आरोपी निर्दोष; साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात मुंबई हायकोर्टाचा निकाल



मुंबईमध्ये 11 जुलैला 2006 मध्ये लोकलमध्ये तसेच रेल्वे स्टेशन परिसरात स्फोट झाले होते. या साखळी बॉम्बस्फोटमुळे मुंबईसह महाराष्ट्र हादरला होता. या बॉम्बस्फोट तब्बल 209 जणांचा मृत्यू झाला होता तर 700 जण जखमी झाले होते. या प्रकरणात तब्बल 12 जणांना सत्र न्यायालयाने दोषी ठरवले. पाच जणांना फाशीची तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेबावर आरोपी हायकोर्टात गेले होते. मुंबई हायकोर्टात या केसचा आज (सोमवारी) निकाल जाहीर झाला. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती

पान 3 वर

## महादेव मुंडेंच्या न्यायासाठी जिल्हा बंद करणार" मनोज जरांगेंचा इशारा

### मनोज जरांगेंनी घेतली पिडीत ज्ञानेश्वरी मुंडेंची भेट



मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी परळीमध्ये ज्ञानेश्वरी मुंडे आणि मुंडे कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जिल्हा बंदचा इशारा दिला आहे. जर 25 तारखेपर्यंत सरकारने एसआयटी, सीआयडी नेमली नाही तर जिल्हा कडेकोट बंद असेल, असा इशारा त्यांनी दिला.

ज्ञानेश्वरी मुंडे यांचे भाऊ यांनी जरांगेंना माहिती देताना सांगितलं की, सुरुवातीला पोलिसांनी 150 मोबाईल नंबर तपासले होते. त्याले 6 मोबाईल नंबर त्यांना निष्पन्न होते. म्हणजे पोलिसांना नेमके आरोपी माहिती आहेत... परंतु पुढे काहीच झालं नाही असे त्यांनी सांगितले.

परळी प्रतिनिधी

परळीचे व्यापारी महादेव मुंडे यांच्या खुनाला 18 महिने झाले तरी आरोपी अटक झालेले नाहीत.बाळा बांगर यांनी स्पष्टपणे आरोपींचे नाव घेत आरोप केले.

तरीही पोलिस काहीच करीत नव्हते. त्यामुळे महादेव मुंडेंच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विषारी रसायन प्राशन करुन जीव देण्याचा प्रयत्न केला होता.

मराठा आरक्षण लढ्याचे नेते

पान 3 वर

## आज ठळक

### उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा



भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी आरोग्याच्या कारणामुळे पद सोडले असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले की, 'प्रकृतीला प्राधान्य देण्यासाठी वैद्यकीय सल्ल्याचे पालन करत मी संविधानाच्या कलम 67(अ) नुसार तात्काळ भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा देत आहे.'जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, 'मी राष्ट्रपतींचे आभार मानतो, माझ्या कार्यकाळात त्यांनी मला दिलेला पाठिंबा आणि त्यांनी केलेले सहकार्य अभूतपूर्व होते. मी पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचेही मनापासून आभार मानतो. पंतप्रधानांनी दिलेला पाठिंबा अमूल्य होता, माझ्या कार्यकाळात मी खूप काही शिकलो आहे.'जगदीप धनखड यांनी आपल्या पत्रात पुढे लिहिले की, संसदेच्या सर्व सदस्यांकडून मला मिळालेले प्रेम आणि विश्वास नेहमीच माझ्या आठवणीत राहील. देशाच्या महान लोकशाहीत उपराष्ट्रपती म्हणून मला अनेक अनुभव मिळाले यासाठी मी मनापासून आभारी आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीचा आणि अभूतपूर्व विकासाचे साक्षीदार होणे आणि त्यात सहभागी असणे ही समाधानाची बाब आहे.जगदीप धनखड यांनी पुढे म्हटले की, या परिवर्तनकारी युगात देशाची सेवा करणे माझ्यासाठी खास सन्मान आहे. हे पद सोडताना, भारताचा जागतिक पातळीवर झालेल्या उदयाचा आणि देशाच्या अभूतपूर्व कामगिरीचा मला अभिमान आहे. भारताचे भविष्य उज्ज्वल असेल असा मला विश्वास आहे. मी मनापासून आदर आणि कृतज्ञता व्यक्त करतो.जगदीप धनखड हे भाजपमध्ये येण्यापूर्वी जनता दल आणि काँग्रेसचे सदस्य होते. 1989 ते 1991 पर्यंत लोकसभेत जनता दलाचे खासदार होते. ते राजस्थानच्या झुंझुनू

पान 3 वर



## जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात परळीत भव्य निदर्शने

### विधेयक रद्द करण्याची मागणी

परळी प्रतिनिधी. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकारावर गदा आणणारे महाराष्ट्र सरकारने पारित केलेले जन सुरक्षा विधेयक रद्द करण्याच्या मागणीसाठी परळीत जनसुरक्षा विधेयक विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक 21 जुलै रोजी परळीत भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच राज्यपालांनी या विधेयकावर स्वाक्षरी न करता ते रद्द करावे अशा आशयाचे निवेदन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या मार्फत राज्यपालांना देण्यात आले.

राज्य सरकारने नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक पारित केले आहे. या कायद्याच्या विरोधात परळीत जनसुरक्षा कायदा विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक 21 जुलै रोजी मोंढा मार्केट येथे दुपारी 12 वाजता भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच यावेळी जनसुरक्षा विधेयक रदद करावे, राज्य सरकारचा जाहीर निषेध, संविधान वाचवा देश वाचवा आदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई,

पान 3 वर

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पावलावर पाऊल ठेवून ना. पंकजाताई मुंडे चालवत आहेत "जनसेवेचा वसा आणि वारसा" - तहसीलदार व्यंकटेश मुंडे

### » ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक सेवा सप्ताहाचे थाटात उदघाटन




परळी वैजनाथ,।दिनांक 21। लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पावलावर पाऊल ठेवून राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन, मंत्री तथा जालना जिल्ह्ययाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे या जनसेवेचा वसा आणि वारसा चालवत आहेत. निस्वार्थ आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व फुलत असुन आगामी आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकामे होऊन जिल्हा सुजलाम सुफलाम होईल असे प्रतिपादन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी आज केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित 21 ते 26 जुलै दरम्यान शहरात शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा सप्ताह राबविण्यात येत असून या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे उदघाटन आज तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केट मधील संपर्क कार्यालयात झालेल्या या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

पान 3 वर

## शुक्रवारी सासर आणि माहेरच्या नागरिकांचे "रास्ता रोको आंदोलन

### महादेव मुंडे खून प्रकरणात एसआयटी स्थापन करा, आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) परळी वैजनाथ येथील व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृण पद्धतीने खून करण्यात आल्याच्या घटनेला तब्बल 19 महिने उलटले असताना आरोपींना अद्यापही अटक झाली नाही. याकरिता संबंधित प्रकरणात SIT स्थापन करण्यात यावी तसेच आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. कन्हेरवाडी हे महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचे माहेर असून, भोपला हे त्यांचे सासर आहे. वरील दोन महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी सासर आणि माहेरच्या सर्व ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवार, दि.25 जुलै रोजी सकाळी 11 वाजता परळी - अंबाजोगाई मार्गावर कन्हेरवाडी येथे लोकशाही मार्गाने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राजेभाऊ श्रीराम फड यांनी कळविली आहे.

याबाबत सविस्तर असे की, परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृणपणे खून झाल्याच्या घटनेला तब्बल 20 महिने उलटले आहेत. या घटनेतील आरोपींना

पान 3 वर






## सेवा संकल्प सप्ताह : आज अजितदादांचे अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यान

### ➡ मोठ्या संख्येने उपस्थित रहा- सोळंके, धर्माधिकारी यांचे आवाहन




परळी वैजनाथ, प्रतिनिधी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी वैजनाथ आयोजित सेवा संकल्प सप्ताहात आज (22 जुलै) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वैजनाथ सोळंके व बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदीर, परळी वैजनाथ येथे आज 22 जुलै रोजी सकाळी 10:00 वाजता हा सोहळा सुरु होणार आहे. या सोहळ्यास उद्घाटक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई अश्विनी सोनवणे (जिरंगे) तर अध्यक्षस्थानी जि. प. गटनेते अजय मुंडे राहणार आहेत. याप्रसंगी शिक्षणतज्ञ व अभियांत्रिकी महाविद्यालय सल्लागार समिती, महाराष्ट्र राज्य संचालक प्रा.



महेश पाटील सर यांचे शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विभाग, बीड शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी भगवान फुलारी,उपविभागीय अधिकारी परळी वैजनाथ अरविंद लाटकर, दिव्यांग कल्याण महामंडळ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, तहसिलदार परळी

पान 3 वर

# संपादकीय

## मुलगी जाते जिवानिशी

ओडिशा आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये गेल्या 15 दिवसांमध्ये दोन तरुण मुलींच्या बाबतीत घडलेल्या घटना कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत. ओडिशामधील घटनेत बीएड् करणाऱ्या त्या अभागी मुलीचा विभागप्रमुखाकडून सतत छळ होत होता. त्याच्याकडून होणाऱ्या लैंगिक मागण्यांना कंटाळून तिने महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे तक्रारही केली होती. तक्रारीची दखल घेतली गेली नाही तर प्राचार्यांच्या केबिनसमोर आपण जीव देऊ असेही तिने लेखी दिले होते. तिच्या तक्रारीची दखल तर घेतली गेली नाहीच, उलट विभागप्रमुख आणि प्राचार्यांनी संगनमताने तिच्या पाठीशी इतर कोणी उभे राहणार नाहीत, अशीही व्यवस्था केली. आपल्या तक्रारीचा काहीच उपयोग होत नाही, या उद्विग्नतेतून तिने स्वत:वर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घेतले. आत्महत्या हा काही कोणत्याही प्रश्नावर उपाय नाही वगैरे तत्त्वज्ञान यावर झाडले जाईलच, पण एखाद्या मुलीच्या गंभीर तक्रारीची दखलच न घेणे आणि संबंधितांना वाचवणे हा देखील मार्ग नव्हे. एखाद्या जिवावर स्वत:वर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घ्यावे एवढी वेळ येत असेल, तर त्याची त्या काळात किती तगमग झाली असेल या विचारानेच कुणाही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा येईल. लैंगिक छळाची तक्रार करायला आधीच एखादी स्त्री स्वत:हून पुढे येणे किती कठीण असते ते वेगळे सांगायला नको. अशा वेळी तिच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याऐवजी तिलाच आत्महत्या करायला भाग पाडणारी आपली व्यवस्था किती कोडगी आहे, ते दिसते. विशाखा समितीची तरतूद, स्त्रियांच्या बाजूने कायदे असे सगळे असतानाही असे घडते हे आणखी चीड आणणारे. कारण कायदा आपल्यासाठी नाही, आपल्या बाजूने नाही हा यातून जाणारा संदेश तर अशा घटनांना तोंड देणाऱ्या इतर स्त्रियांना आणखी नाउमेद करणारा आहे.

घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांना कसे वागवले जाते ते पाहा, असे म्हणावे तर दुसऱ्या एका घटनेत ओडिशाहून जवळपास 1700 किलोमीटर अंतरावर असलेल्या हरियाणामध्ये वडीलच मुलीचा खून करतात. वडिलांच्याच प्रोत्साहनाने टेनिस या खेळात कारकीर्द घडवलेल्या, टेनिस अकादमी चालवणाऱ्या, गाण्याच्या अल्बममध्ये सहभाग घेणाऱ्या राधिका यादव या गुणी मुलीची कहाणी दुर्दैवी ठरली. ती स्वयंपाकघरात काम करत असताना तिच्यावर तिच्या वडिलांनीच पाठीमागून एक नाही, दोन नाही, तर तब्बल पाच गोळ्या झाडल्या. बापलेकीच्या नात्यातील जिव्हाळा बंदुकीच्या गोळ्यांनी संपवण्याइतके क्रौर्य त्या बापात का निर्माण झाले असावे, याचे प्रथमदर्शनी मिळणारे उत्तर थेट मध्ययुगात नेणारे आणि तरीही आजच्या काळातील पुरुषप्रधान मानसिकतेची परिसीमा दाखवणारे आहे. राधिका यादवला तिच्या वडिलांनीच टेनिस खेळायला प्रोत्साहन दिले. तिचे सामने असत तेव्हा आईवडिलांपैकी कोणी तरी सतत तिच्याबरोबर असे. तिच्या वडिलांनीच तिला टेनिस अकादमी सुरु करायला मदत केली. त्यासाठी दोनेक कोटी रुपये खर्च केले असेही वृत्त आहे. भाडेतत्त्वावर दिलेल्या घरांमधून तिच्या वडिलांना चांगले उत्पन्न येत असे. तरीही 'मुलगी कमावते आणि तिच्या पैशांवर तू जगतोस' अशी शेरेबाजी गावात कुणी तरी केल्यावर या दीपक यादव नावाच्या इसमाचा अहंकार दुखावला आणि त्याने 'टेनिस अकादमी बंद करून टाक' असा लकडा मुलीमागे लावला. या गोष्टीला राधिका तयार नव्हती आणि त्यामुळे तिच्या वडिलांनी तिचा गोळ्या घालून खून केला असे म्हटले जात आहे. राधिकाचा मोकळा वावर, ती करत असलेले रील्स यावरही तिच्या वडिलांचा आक्षेप होता आणि त्या सगळ्या रागातून त्यांनी हे अत्यंत हिंस्रा पाऊल उचलले असे सांगितले जात आहे.

ओडिशा असो की हरियाणा, घर असो की दार, सगळीकडे पुरुषांची मानसिकता एकाच प्रकारची का आहे? आपल्याच प्रोत्साहनाने आपली लेक काही तरी करू पाहत असेल तर तिच्याभोवती आपल्या भक्कम आधाराचे संरक्षक कवच उभारावे असे या बापाला का वाटले नसेल? 'तुम्हीही तुमच्या मुलीला असेच उभे करा', असे टीकाकारांना ठामपणे का सांगता आले नसेल? लोक दोन्ही बाजूंनी बोलतात, तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेच बरे असे का वाटले नसेल? आपली मुलगी, बहीण, बायको यांनी आर्थिकदृष्ट्या आपापल्या पायांवर ठाम उभे असलेच पाहिजे, वेळ पडली तर आपल्याशिवायही त्यांना नीट जगता आले पाहिजे, असे अशा पुरुषांना का वाटत नाही? महत्त्वाकांक्षेचे पंख लेऊन आपल्या घरातली कोणीही स्त्री उडू पाहत असेल तर त्या पंखांना बळ द्यायचे, भक्कमपणे पाठीशी उभे राहायचे की ते पंखच छाटून टाकायचे? कुणी तरी उठून टीका करते तर त्या टीका करणाऱ्याला त्याची जागा दाखवायची की आपल्याच लेकीचा जीव घ्यायचा? मुळात बायको, मुलगी, बहीण यांच्या कमाईवर एखाद्या पुरुषाला कधी तरी जगावे लागले तर ते त्याला किंवा इतरांना इतके टोचावे ते का? खरे तर ते टोचणे सोयीनुसारच असते. बायकोच्या कमाईवर बिनदिक्कतपणे हक्क सांगत, उलट तिलाच न्यूनगंड देणाऱ्या पुरुषांची समाजात कमतरता नाही. पण इथे आपल्याकडे पैसा असतानाही आपल्याला 'मुलीच्या पैशावर जगतोस' असे हिणवले जाते, हा राग. म्हणजे पुन्हा अहंकाराला धक्काच. आदर्श राजा ठरण्याच्या नादात कुणाच्या तरी टीकेमुळे आपल्या गर्भवती पत्नीचा 'त्याग' करण्याच्या वृत्तीपेक्षा तो फारसा वेगळा नाही. काहीही झाले की त्याला धार्मिक वळण द्यायचे हा आपल्याकडचा अलीकडच्या काळातला आवडता छंद. राधिका यादवने इनाम उल हक या गायकाच्या 'कारवाँ' या अल्बममध्ये सहभाग घेतला

# पत्रकारिता करिअर : समाज बदलण्याची ताकद असलेले क्षेत्र!

**डॉ. भारत कऱ्हाड**

पत्रकारिता ही केवळ एक नोकरी किंवा व्यवसाय नाही, तर समाजाला दिशा देणारी आणि परिवर्तन घडवणारी एक शक्ती आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे प्रतिनिधित्व करताना पत्रकारितेची भूमिका ही समाजातील सत्य, अन्याय, भ्रष्टाचार, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या वाटा उलगडणारी असते. म्हणूनच पत्रकारिता क्षेत्रात करिअर करणे म्हणजे सामाजिक बांधिलकी, जिज्ञासा, सत्यशोधन आणि लोककल्याणाची जबाबदारी पेलण्याचे आव्हान स्वीकारणे होय.

पत्रकारितेचे स्वरुप आणि महत्त्व:

पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या अडचणी, गरजा, अपेक्षा शासनापर्यंत पोहोचवल्या जातात. प्रशासनाच्या निर्णयांवर, धोरणांवर प्रश्न विचारण्याचे सामर्थ्य पत्रकारितेकडे असते. एखादी घटना, अपघात, गुन्हेगारी प्रकार, भ्रष्टाचार यावर प्रकाशझोत टाकल्यावर व्यवस्थेला हलकेच झटका बसतो आणि कारवाईस गती येते.

त्याचप्रमाणे समाजातील सकारात्मक उदाहरणे, प्रेरक कथा, विज्ञान, शिक्षण, आरोग्य, कलेतील यशोगाथा प्रसिद्ध करून पत्रकारिता समाजमन घडवण्याचे काम करते. त्यामुळे पत्रकारिता ही समाजाला जागरूक, सक्रिय, विवेकी बनवते.




बदलत्या काळातील पत्रकारिता:

आज डिजिटल युगात पत्रकारितेचे स्वरुप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. पारंपरिक प्रिंट मीडियासोबतच इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल पोर्टल्स, सोशल मीडिया यांमुळे माहितीचा वेग आणि व्याप्ती वाढली आहे. त्यामुळे आजचा पत्रकार केवळ लेखणीपुरता मर्यादित न राहता व्हिडीओ रिपोर्टिंग, फोटोजर्नालिझम, डेटा जर्नालिझम, फॅक्ट चेकिंग, पॉडकास्ट, ब्लॉगिंग अशा विविध माध्यमांतून समाजाला जागवतो आहे.

पत्रकारितेतील संघर्ष आणि आव्हाने:हे क्षेत्र जितके प्रेरणादायी आहे तितकेच आव्हानात्मकही आहे. सत्ताधाऱ्यांवर टीका करताना किंवा भ्रष्टाचार, गुन्हेगारी उघड करताना पत्रकारांना धमक्या, हल्ले, खोट्या केसेसचा सामना करावा लागतो. राजकीय, आर्थिक दबाव अनेकदा पत्रकारितेच्या स्वातंत्र्याला मारक ठरतो.

नोकरीतील अस्थिरता, कमी वेतन, अति श्रम, मानसिक तणाव यामुळे अनेकांना या क्षेत्रात टिकवणे कठीण जाते. याशिवाय डिजिटल माध्यमांच्या प्रसारामुळे बनावट बातम्या, अफवा, ट्रोलिंग यांचा धोका वाढला आहे.

करिअर संधी आणि कौशल्ये:पत्रकारिता क्षेत्रात प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, रेडिओ, डिजिटल मीडिया, सोशल मीडिया मॅनेजमेंट, कंटेंट रायटिंग, फॅक्ट चेकिंग, पब्लिक रिलेशन्स अशा अनेक संधी आहेत. यासाठी भाषा कौशल्य, संशोधन क्षमता, तांत्रिक ज्ञान, वेगाने बदलणाऱ्या माध्यमांची समज, संवाद कौशल्य, तणावातही काम करण्याची तयारी लागते.

उपाय व पुढचा मार्ग:

पत्रकारिता क्षेत्रातील आव्हानांवर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, डिजिटल पत्रकारिता, डेटा जर्नालिझम, फॅक्ट चेकिंग यासारखी कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. सत्य आणि नैतिक मूल्ये जपत कोणत्याही राजकीय, आर्थिक दबावाला बळी न पडता निर्भीडपणे काम करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे. मानसिक आरोग्य जपण्यासाठी समुपदेशन व तणाव व्यवस्थापनाचे उपाय महत्त्वाचे ठरतात. पत्रकारांनी सतत शिक्षण घेत राहणे, नव्या घडामोडींची माहिती ठेवणे गरजेचे आहे. याशिवाय स्वतंत्र पत्रकारितेच्या माध्यमातून, जसे यूट्यूब चॅनल, ब्लॉग, पॉडकास्टद्वारे, आपला स्वतंत्र आवाज निर्माण करता येतो. पत्रकार संघटनांनीही पत्रकारांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका घेणे आवश्यक असून समाजात पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे महत्त्व रुजवणे ही काळाची गरज आहे.

एकुणच, पत्रकारिता ही समाजाला बदलण्याची, प्रश्न विचारण्याची, व्यवस्थेला जागे करण्याची आणि लोकांना शिक्षित करण्याची ताकद असलेली प्रक्रिया आहे. म्हणूनच पत्रकारितेत करिअर करणे हे केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून समाजहितासाठी योगदान देण्याचे कार्य आहे. ज्या पत्रकारांमध्ये जिज्ञासा, निर्भीडता, अभ्यास, नैतिकता आहे, ते या क्षेत्रात निश्चितच यशस्वी होतील आणि समाज परिवर्तनाचे शिल्पकार ठरतील.


**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# नाटो आणि ट्रम्प यांनी व्यापार संदर्भात भारताला धमकी देणे बंद करावे.

सध्याच्या परिस्थितीत अमेरिका व नाटो देश जगात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी टॅरिफ बॉम्बचा वापर करतांना दिसत आहे.त्यामुळे नाटो भारताला धमकी देत आहे की रशियाशी व्यापार थांबवा अन्यथा भारतावर 100 टक्के टॅरिफ लादण्यात येईल.टॅरिफच्या बाबतीत अमेरिका व नाटोने भारताला धमकी देऊ नये याचे विपरीत परिणाम त्यांनाच भोगावे लागतील हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज जगात वर्चस्वाच्या लढाईत अमेरिका व नाटो देश उतरले आहेत आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका व नाटो प्रत्येक देशांवर दबाव तंत्राचा वापर करीत आहेत. जेनणेकरुन इतर देशांमध्ये भितिचे वातावरण निर्माण व्हावे व आपल्या दबावात रहावे. रशिया हा भारताचा घनिष्ठ मित्र आहे आणि राहील ही बाब जगाला सुद्धा माहित आहे.त्याचप्रमाणे भारताचे अमेरिकेसोबत सुध्दा संबंध चांगले आहेत.परंतु अमेरिकेची दोगली आणि स्वार्थी निती पहाता भारत अमेरिकेपासून सावधगिरी बाळगत आहे. कारण भारताचे कट्टर दुष्मण पाकिस्तान व चीन आहे.परंतु भारताचे वाढते वर्चस्व पहाता अमेरिका पाकिस्तानला उजेडातुन व आंधारातुन सर्वतोपरी मदत करीत आहे.त्यामुळे भारताची वाढती शक्ती व जागतिक संबंध पहाता अमेरिका व नाटो यांच्यात जेलसीची भावना निर्माण झाली आहे.त्यामुळे भारताचे पाय ओढण्यासाठी अमेरिका व नाटो रशियाशी व्यापार थांबावा यासाठी भारतासह अनेक देशांवर दबाव तंत्राचा वापर करीत आहेत.युक्रेन आणि रशिया यांच्यात 24 फेब्रुवारी 2022 पासुन युध्द सुरु आहे आणि आता हे युध्द विनाशकारी होत आहे.या युध्दात नाटोसह अमेरिका युक्रेनला संपूर्ण युध्द सामग्रीची मदत करीत आहे यामुळेच आज युक्रेनचे मनोबल वाढले आहे.परंतु रशियाच्या अनेक अडचणी वाढतांना दिसतात.कारण त्याचीही मानवीय आणि वित्तीय हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि होत आहे.तरीही रशिया युक्रेन व नाटोला जशास तसे उत्तर देत आहे. याच पार्श्वभूमीवर रशियाचे खच्चीकरण करण्यासाठी नाटोने कठोर भूमिका घेतली असून रशिया सोबत व्यापार संबंध असणाऱ्या देशावर नाटोची करडी नजर आहे.त्यामुळे रशियाशी जवळीक असलेल्या व व्यापार करणाऱ्या ब्राझील, चीन आणि भारत यासारख्या देशांवर कठोर निर्बंध लादण्याचा इशारा नाटोचे सेक्रेटरी जनरल मार्क रूट यांनी 16 जुलै 2025 दिला.परंतु मार्क रुट ने असे समजू नये की भारत नाटोला घाबरेल.भारत सर्वगुणसंपन्न आहे आणि भारत आपल्या आवश्यकतेनुसार उर्जा निर्मितीसाठी रशियाकडून तेल खरेदी करीत असतो आणि खरेदी करीत राहिल.त्यामुळे अमेरिकेने टेंशन घेरण्याची गरज नाही. कारण रशिया-भारताचे मित्रत्वाचे संबंध आहे त्यामुळे अमेरिकेने भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्नही करु नये.कारण रशिया-भारत यांच्यात खरे मित्रत्व आहे ही बाब जगाला सुद्धा माहित आहे व दिसत आहे.परंतु अमेरिका स्वतःच्या वर्चस्वासाठी पाकिस्तान सारख्या आतंकवादी राष्ट्रांना मांडीवर घेऊन डोनाल्ड ट्रम्प नोबेल शांती पुरस्कारासाठी भिक मांगतांना दिसतो.परंतु भिकाऱ्यांना प्रत्येक देश भिक देईलच असे नाही. सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प संपूर्णपणे स्वार्थी झाला असून मनमानी करीत असुन मानवी विचारांची हत्या करीत आहे.कारण डोनाल्ड ट्रम्प जगाच्याच नाही तर ते स्वतःच्या देशातील लोकांच्या नजरेतुन सुध्दा उतरले आहे प्रख्यात उद्योगपती एलन मस्क यांच्यासोबत सुध्दा डोनाल्ड ट्रम्प यांचे चांगलेच खटकले आहे.जगातील अनेक देशातुन लाखो विद्यार्थी अमेरिकेत शिकायला जायचे परंतु डोनाल्ड ट्रम्पच्या हेकडीमुळे,मनमानी कायद्यामुळे आणि टॅरिफचा वाढता भार पहाता जगातील 70 टक्के विद्यार्थ्यांचा अमेरिकेपासून मोहभंग झाला आहे.म्हणजे डोनाल्ड ट्रम्प व अमेरिका सरकार सर्वच बाबतीत तानाशाहवर उतरल्याचे दिसून येते.परंतु अमेरिका ही बाब विसरत आहे आता जे पाप करीत आहे त्याचे प्रायश्चित्त त्याला भोगावेच लागेल.भारत कोणालाच भित नाही आणि भीनारसुध्दा नाही.कारण आपली ऊर्जा सुरक्षिततेसाठी भारत 27 देशातुन कच्च्या तेलाची आयात करीत असे.परंतु वाढती आवश्यकता पहाता यात वाढ झाली असून श आता भारत 40 देशांकडून तेल आयात करीत आहे.त्यामुळे रशियावरील प्रतीबंधीत कोणत्याही कारवाईची भारताला चिंता नाही याची अमेरिकेने जाणीव ठेवावी.संपुर्ण जगाला कल्पना आहे की अमेरिका धोकेबाज आणि स्वार्थी देश आहे तो केव्हाही कधीही कोणालाही धोका देवू शकतो याचे अनेक उदाहरणे जगासमोर आहे.अफगानिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून अमेरिकेने अफगानिस्तानमधुन पळ काढला व यात लाखो निरपराधांचा बळी गेला याला कारणीभूत अमेरिका आणि ऑगस्ट 2021 मध्ये अफगाणिस्तानचा ताबा तालिबानने घेतला.त्याचप्रमाणे स्वतःच्या स्वार्थासाठी युक्रेनला अमेरिकेने युध्दाच्या खाईत लोटले व लाखोंच्या निरपराधांचा बळी गेला व जात आहे सोबत अनेक ठीकाणे नामशेष होत आहे.अशाप्रकारे आजच्या परिस्थितीत अमेरिका कोणाचा केव्हा घात करेल हे सांगता येत नाही.त्यामुळे जगातील संपूर्ण राष्ट्रांनी अमेरिका व मुख्यत्वेकरुन डोनाल्ड ट्रम्प पासून सावधगिरी बाळगली पाहिजे अन्यथा घात होवू शकतो.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा घनिष्ठ मित्र समजला जाणारा डोनाल्ड ट्रम्प आज भारताचा कट्टर शत्रू आतंकिस्तान पाकिस्तानला जवळ करीत आहे यावरुन आपण समजू शकतो डोनाल्ड ट्रम्प शांतीचा पुरस्करता नसुन आतंकवाद्यांचा मदतगार आहे.सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प नोबेल शांती पुरस्कारासाठी मोठी धडपड करीत आहेत.भारत-पाकिस्तानमधील युद्धविराम मी केला असे डोनाल्ड ट्रम्प एकवेळा नाही तर 24 वेळा सांगितल्याचे जाहीर केले आहे. आता असेही म्हणत आहे की 5 लडाकू पडले पण कोणाचे पडले ते सांगायला तयार नाहीत. भारत-पाकिस्तानला व्यापार व्यवहार थांबविण्याची धमकी दिली तेव्हा युद्धविराम झाला असा दावा नुकताच डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.यावरुन स्पष्ट होते की डोनाल्ड ट्रम्प बोलतात एक आणि करतात वेगळेच काही त्यामुळे आता डोनाल्ड ट्रम्प पानचट झाल्याचे स्पष्ट दिसून येते.आता जगाच्या लक्षात आले की डोनाल्ड ट्रम्प जेवढीही काही खटाटोप करीत आहे ती फक्त नोबेल शांतता पुरस्कारासाठी परंतु डोनाल्ड ट्रम्प आजही नोबेल पुरस्कारांपासून कोसोदुर आहेत.


**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

## शेवटी एकनिष्ठेचे फळ मिळालेच : मा रामप्रभु ( बाबा ) मुंडे यांना बिनविरोध धारूर तालुका खरेदी - विक्री संघाचे संचालक



धारूर ( बाबुराव तिडके ) राज्याच्या पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे यांचे निष्ठावंत सैनिक तथा डॉ स्वरूपसिंह हजारी यांचे अत्यंत विश्वासु श्री रामप्रभु ( बाबा ) मुंडे गेल्या विस वर्षा पासुन ते भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते कोणत्याही पदाची अपेक्षा न करता सदैव भाजपाचे काम करण्यास ते तत्पर असतात धारूर तालुका खरेदी विक्री संघावर त्यांची बिनविरोध निवड झाली असता सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे मंत्री ना पंकजाताई व डॉ स्वरूपसिंह हजारी साहेब यांच्याकडे या तालुक्यातील जनता मा श्री रामप्रभु ( बाबा ) मुंडे यांना तालुक्याच्या खरेदी विक्री संघावर एकनिष्ठेचे फळ म्हणुन अध्यक्ष / उप - अध्यक्ष या पदावर काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी होताना दिसत आहे

## मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प आमदार प्रकाश सोळुंके यांनी रोखला



वडवणी प्रतिनिधी, (बाबुराव तिडके)

वडवणी तालुक्यातील कुपा येथे इंदिरानगर मध्ये गट क्रमांक 104 मधील गायरान जमीनमधला मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प एम एस सी बी सोलार ॲग्रो प्रा ली साठी हस्तांतरित केलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना 24 तास लाईट उपलब्ध असणार आहे. त्याचबरोबर वेळेच्या वेळेला लाईट असल्यामुळे पाणी मिळणार आहे या प्रकल्पाचा फायदा सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर कामगार व गावकऱ्यांसाठी अति महत्त्वाचा आहे. परंतु माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मुद्दामहून हा प्रकल्प रोखला आहे आशी चर्चा ऐकायला मिळत आहे. या भागातील शेतकऱ्यांसाठी त्यांची किती धडपड आहे हे यावरुन सिद्ध होते. एवढेच नव्हे तर त्यांनी कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर, तहसीलदार यांना पत्र देऊन हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी केलेली आहे. परंतु या प्रकल्पामुळे याच गावातील परिसरातील शेतकरी सर्वसामान्य माणसाला 24 तास वीज मिळणार आहे. आणि 24 तास वीज मिळाल्यामुळे वेळेच्या वेळेला पाणी सुद्धा मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प सरकारने या ठिकाणी बनवण्याचा निर्णय घेतला परंतु त्याला विरोध सत्तेमधील असलेले स्थानिक आमदार प्रकाश सोळुंके यांनी केल्याने या ठिकाणी शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होणार आहे. आणि हे नुकसान होऊ नये म्हणून हा प्रकल्प होणे अति महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करणे करिता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट सत्ताधारी पक्षाचे सहकारी आमदारच जाणीवपूर्वक विरोध करत आहेत का?. मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली दर महिन्याला बैठक घेतली जाते.

पालकमंत्री अजितदादा पवार सुद्धा दर महिन्याला मीटिंग घेतात.

सरकारी योजनेला सरकारच्याच आमदारांचा घरचा आहेर म्हणायचा का? याबाबत उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

# फार्मसी क्षेत्रात नवा मैलाचा दगड — प्रा. डॉ. निखिल जाधव यांचे पुस्तक एम.फार्म विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध



माजलगाव /( अनंत घडसिंगे ):- फार्मसी क्षेत्रात नवनवीन शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना दिशा देणारे गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे, विभाग प्रमुख प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी एम.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त "मॉडर्न ऍनालॅटिकल टेक्निक्स" असे नवीन पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे प्रथमदर्शी लोकार्पण गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष व प्रख्यात हृदयविकार तज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.

औषधनिर्माणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) विषयांमधील फार्मास्युटिकल ॲनालिसिस हा विषय सर्व डिपार्टमेंट साठी कॉमन आहे त्याच बरोबर यात सिलॅबसवर आधारित भारतीय लेखकांचे फारच तुरळक व समजण्यास कठीण पुस्तके आहेत त्याचबरोबर यांतील संकल्पना गुंतागुंतीची आणि भाषा अवघड असल्यामुळे विद्यार्थी या विषयाकडे दुर्लक्ष करतात असे जाधव यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी हे पुस्तक 'फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाने' निर्देशित केलेल्या बी. फार्मसी अंतिम आणि एम.फार्मसी प्रथमवर्ष अभ्यासक्रमातील फार्मास्युटिकल ॲनालिसिस विषयाशी निगडीत बनवले आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी सुलभ भाषेत आणि अभ्यासक्रमावर आधारित मार्गदर्शन करणारे असून त्यात सविस्तर आकृत्या व माहितीपूर्ण तक्ते दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील ॲनालिसिस विषयाची भीती निघून जावी तसेच विद्यार्थी परीक्षेसह संशोधन आणि औद्योगिक क्षेत्रातही आत्मविश्वासाने पुढे जावेत, हा या पुस्तकामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. निखिल जाधव यांनी सांगितले.

पुस्तकाच्या प्रकाशनावेळी बोलताना डॉ. यशवंत राजेभोसले म्हणाले, "एम.फार्म विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन देणारे हे पुस्तक निश्चितच शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर घालेल." या कार्यक्रमास गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य अमित बिंदू, गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू उपस्थिती लाभली. या यशाबद्दल सर्व स्टाफने जाधव सरांचे अभिनंदन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

सभागृहात (विधानसभेत) काय कामकाज सुरु आहे, हे पाहण्यासाठी मोबाइलवरून युट्यूबवर गेलो होतो. युट्यूबवर व्हिडीओ सुरु केल्यानंतर जाहिराती येत असतात. त्याप्रमाणेच त्यावेळी सदर जाहिरात आपोआप प्ले झाली. मी जाहिरात स्किप करून पुढे गेलो. पण व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांनी फक्त 18 सेकंदाचाच व्हिडीओ दाखवला.” दरम्यान सूरज चव्हाण यांचा राजीनामा आम्ही घेतला आहे असं तटकरे म्हणाले माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याबाबत काय? याचं उत्तर दिलं.सूरज चव्हाण यांच्याबाबत पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. रविवारी झालेल्या प्रकरानंतर पक्षाच्या अध्यक्षांनी त्यांना सांगितलं की तुम्ही राजीनामा द्यावा. ज्यानंतर महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस युवा प्रदेशाध्यक्ष पदाचा सूरज चव्हाण यांनी राजीनामा दिला आहे. महाराष्ट्राच्या जनतेला मी सांगू इच्छितो की लातूर दौऱ्यावर मी होतो. पत्रकारांशी मी बोलत होतो. त्यानंतर छावा संघटनेने त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. लोकशाहीत सत्तेत असलेल्या राज्यकर्त्यांनी संयमी भूमिका घेतली पाहिजे तसंच मी त्यांचं निवेदन स्वीकारलं. लातूरमधल्या व्यावसायिकांशी, इतर तज्ज्ञांशी मी चर्चा केली. एका कर्करोग रुग्णालयाला मी भेट दिली. तिथे जो प्रकार झाला त्याचा मी निषेध नोंदवला. पुढील कारवाई केली जाईल असं सुनील तटकरेंनी म्हटलं आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याचा निर्णय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार घेतील. असंही सुनील तटकरे म्हणाले.जे पदाधिकारी माझ्याकडे निवेदन द्यायला आले होते त्यांच्याशीही मी चर्चा केली. आता पुढची जी काही भूमिका आहे ती पक्ष घेईल. विधानसभेतल्या दारुण पराभवानंतर संजय राऊत यांची मानसिक स्थिती बिघडली आहे. त्यानंतर ते जसं स्वप्न पाहतात तसं रोज बोलतात, त्यांच्याविषयी विशेष काही बोलावं असं मला वाटत नाही असं तटकरेंनी म्हटलं आहे. माणिकराव कोकाटे यांच्याकडे कृषी खातं आहे. त्यांच्याकडून काही चुकीची विधानं गेली आहेत. त्यानंतर त्यांना समज देण्यात आली आहे. पण काल जो प्रकार समोर आला त्यानंतर काय करायचं याचा निर्णय अजित पवार घेतील असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

---------------------------------------------

एस चांडक यांच्या खंडपीठाने निकाल देताना साखळी बॉम्बस्फोटमधील 12 आरोपींना निर्दोष मुक्तता केली. पुराव्यांच्या अभावामुळे आरोपींना निर्दोष मुक्तता करण्यात आली. दरम्यान, 12 आरोपींपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे 11 आरोपींची तुरुंगातून सुटका होणार आहे.11 जुलै 2006 मध्ये मुंबईच्या उपनगरीय माटुंगा रोड , माहिम जंक्शन , वांद्रे , खार रोड , जोगेश्वरी , भाईंदर आणि बोरिवली येथे अवघ्या 11 मिनिटांमध्ये बॉम्बस्फोट झाले होते. पोलिसांनी बॉम्बस्फोटात सहभागी असल्याच्या संशयावरून तीन जणांना अटक केली. ताब्यात घेतेले संशयीत हे बंदी असलेल्या सिमी संघटनेशी संबंधित असल्याचे त्यावेळी पुढे आले होते.विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी आरोपींना निर्दोष सोडण्याच्या निकालावर बोलताना सांगितले की, सरकारला पुन्हा निकालचा चाचपणी करून सुप्रीम कोर्टात अपिल दाखल करावे लागेल. जर सुनावनीत शिक्षेवर स्टे मागितला असेल तर आरोपी लगेच तुरुंगाबाहेर येणार नाहीत. सरकारला निकालपत्राचे मुल्यमापण करावे लागले.

---------------------------------------

दरम्यान ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, तत्कालीन एसपी ठाकूर यांचेही सीडीआर तपासले पाहिजेत. त्यांना कुणाचे फोन आले, हे स्पष्ट झालं पाहिजे. एसपी ठाकूर यांच्यासह पीआय सानप यांचा सीडीआर काढण्याची गरज आहे. कारण त्यांनाही कुणाचे फोन आले होते, हे पुढे आलं पाहिजे.

माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्र्यांना जाहीरपणे आवाहन करतो की, मुंडे कुटुंबियांची एसआयटी आणि सीआयडीची मागणी मान्य करा. 25 तारखेपर्यंत पाऊल उचललं नाही तर जिल्हाभर आणि राज्यभर आंदोलन करावं लागणार आहे. जर महावेद मुंडेंना न्याय मिळाला नाही तर जिल्हा कडक बंद राहील.

“मुख्यमंत्र्यांनी आमचा अंत बघू नये, मी जर या मॅटरमध्ये घुसले तर मी काय करतो, हे सगळ्यांना माहिती आहे. पीआय, एपीआय यांचे सगळ्यांचे कॉल डिटेल्स घ्या. सरकारने कामाला लागावं नाहीतर वेगळं चित्र बघायला मिळेल.

“कुटुंब इतकं हाताश झालंय.. माऊलीच्या नवऱ्याचं मांस टेबलावर नेऊन ठेवलं, हे अत्यंत दुर्दैवी आहे. ही माऊली मुख्यमंत्र्यांकडे वेळ मागत आहे. तरीही वेळ मिळत नाही, फडणवीसांना सामान्य जनता पाहिजे की गुंड? असा प्रश्न उपस्थित होतोय.” असा टोला जरांगेंनी फडणवीसांना लगावला.

---------------------------------------------

कम्युनिस्ट पक्षाचे नेते अजय बुरांडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड प्रकाश मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, काँग्रेसचे नेते वसंतराव मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, शिवसेनेचे तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष श्रीकांत पाथरकर, जेष्ठ नेते उत्तम माने, संभाजी ब्रिगेडचे सेवकराम जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे देवराव लुगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक रानबा गायकवाड, कॉ पांडुरंग राठोड, पत्रकार भगवान साकसमुद्रे, विद्यार्थी आघाडीचे सय्यद उमेर आदिंनी या विधेयकाच्या विरोधात आपले विचार मांडले. राज्य सरकारने आणलेला जनसुरक्षा हा कायदा सर्वसामान्य नागरिकांना भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकार आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणार असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिक्षक नेते पी.एस.घाडगे, जगन्नाथ सोळंके, विठ्ठलराव झिलमेवाड, भगवान बडे, दता दहिवाळ, धम्मानंद क्षीरसागर, गौतम साळवे, ज्ञानेश्वर मुंडे, बालासाहेब गिते, प्रकाश वाघमारे, सय्यद जाबेर, अहेमद सय्यद, सय्यद फेरोज, यशवंत सोनवणे, दिपक सिरसाठ, मदन वाघमारे, शंकर शेजुळ, जावेद शेख, रंजना खरात, सुभाष सावंत, बाबासाहेब रोडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते , सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------------------

भाजपचे राज्य परिषद सदस्य सतीश मुंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीराम मुंडे, भाजपाच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नीळकंठ चाटे, दीनदयाळ बँकेचे उपाध्यक्ष ॲड. राजेश्वर देशमुख, भाजयुमोचे प्रदेश चिटणीस.ॲड. अरुण पाठक यांची उपस्थिती होती.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी उपेक्षित आणि गोरगरिबांसाठी आयुष्यभर काम केले. जनतेच्या हितासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. सामान्यांचा आवाज म्हणून ते समाजामध्ये वावरले. हाच वसा आणि वारसा राज्याच्या मंत्री ना. पंकजाताई मुंडे या समर्थपणे चालवत असून आगामी काळात त्यांच्या हातून जिल्ह्यातील आणि राज्यातील विवाह विविध विकास प्रकल्प मार्गी लागतील अशी अशा तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी व्यक्त करून भाजपच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या सेवा सप्ताहाचे कौतुक केले. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता समाजसेवेचे उपक्रम राबवण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले आहे. त्यांची ही भूमिका अभिमानास्पद असल्याचे सांगून त्यांच्या सर्व उपक्रमांना प्रशासनाचे सहकार्य राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी सतीश मुंडे, श्रीराम मुंडे, निळकंठ चाटे, डॉ. शालिनीताई कराड, ॲड. अरुण पाठक यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार राबविण्यात येत विविध उपक्रमांची माहिती देऊन नागरिकांनी याचा लाभ घ्यावा आणि कार्यकर्त्यांनी आठ दिवस पूर्ण वेळ देऊन हा कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचलन ज्ञानोबा सुरवसे यांनी केले. दरम्यान आज आज आधार कार्ड अपडेट, प्रधानमंत्री आवास योजना अर्बन 2.0 घरकुल नोंदणी, बारा बलुतेदार विश्वकर्मा योजना नोंदणी, ऊसतोड मजुर महिलांची रोगनिदान तपासणी आदी उपक्रम घेण्यात आले. यात नागरीकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

मंगळवारचे उपक्रम

-------

मंगळवार दि. 22 - रक्तदान शिबीर सकाळी 9 ते दुपारी 5 पर्यंत पंकजाताई यांचे संपर्क कार्यालय, बोधीवृक्ष वृक्षारोपण स.9.30 वा. स्थळ : भिमवाडी, स.10.30 वा. स्थळ : हनुमान नगर. तर उद्या बुधवार दि. 23 जुलै - सकाळी 9 वा. छत्री वाटप व कापडी पिशवी वाटप, सकाळी 11 वा., वह्या वाटप स.11.30 वा. माध्य. आश्रम शाळा, शिवाजी नगर, व12 वा. विलाल उर्दू प्रा. शाळा, हमालवाडी.

---------------------------------------

अद्यापही अटक करण्यात आलेली नाही. अतिशय संथगतीने घटनेचा तपास सुरु आहे. या प्रकरणी तत्काळ एसआयटी स्थापन करण्यात यावी व सर्व आरोपींना तत्काळ अटक करावी ही मागणी जोर धरत आहे. कन्हेरवाडी हे महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचे माहेर असून, भोपला हे त्यांचे सासर आहे. दोन्हीही गावातील नागरिक लेकीला न्याय मिळवून देण्यासाठी सरसावले असून, यासंदर्भात शुक्रवार, 25 जुलै रोजी सकाळी 11 वाजता परळी - अंबाजोगाई मार्गावरील कन्हेरवाडी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी, बीड, पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तथा परळी शहर, संभाजीनगर, ग्रामीण पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे.

-------------------------------------

वैजनाथ व्यंकटेश मुंडे, न.प. मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात सेवा संकल्प सप्ताहात घेण्यात आलेल्या योगासन स्पर्धा, मृदंग वादन स्पर्धा, महिला भजन स्पर्धा, शालेय सांस्कृतिक स्पर्धा महोत्सव शहर व ग्रामीण, सामान्य ज्ञान स्पर्धा, रील्स स्पर्धा या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहेत. तसेच गुणवंतांचा गुणगौरव सोहळा होणार आहे.

तरी या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------------------------------

लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले होते. 1991 मध्ये ते काँग्रेसमध्ये सामील झाले. मात्र 1991 साली त्यांचा अजमेर लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. त्यानंतर ते राजस्थानच्या किशनगड विधानसभा मतदारसंघातून आमदार बनले. 1998 मध्ये त्यांनी झुंझुनू लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली, मात्र यातही त्यांचा पराभव झाला. 2003 मध्ये ते भाजपमध्ये सामील झाले. उपराष्ट्रपती होण्यापूर्वी धनखड हे 2019 ते 2022 पर्यंत पश्चिम बंगालचे राज्यपाल होते.

## पान 4 वरुन

चांगला पाऊस झालेला नाही. पिके जोमदार आली पण पाण्याविना त्यांची वाढ खुंटू लागली. काही ठिकाणी पिके सुकू लागली आहेत. शेतकरी दररोज पावसाची वाट पाहत आहे. गेल्या दोन तीन दिवसाच्या कार्यकाळत जिल्ह्यातील काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या सरी पडल्या आहेत. यापावसामुळे पिकांना जिवदान मिळाले असले तरी मोठा पाऊस पडला तर पिके चांगली येवू शकतात. पावसाचे प्रमाण कमी असल्याने मराठवाड्यातील धरणे अजुनही कोरडे आहेत. काही बोटावर मोजण्या एवढ्या धरणात या पुर्वीच्या पावसामुळे पाण्याचा साठा जमा झाला त्यानंतर पाऊस झाला नसल्याने धरणे रिकामी आहेत.

------------------------------

सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. सर्वे पूर्ण करण्याची मुदत संपणार असून त्याआधी पात्र असलेल्या गरजू नागरिकांनी आपल्या घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करुन घ्यावे. नव्या मुदतवाढीमुळे अधिकाधिक पात्र कुटुंबांना याचा लाभ घावा असे आवाहन केले आहे. ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत 31 जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करावा.

सर्वेक्षण प्रक्रिया सुलभ आणि सर्वसमावेशक व्हावी यासाठी प्रशासनाने दोन पद्धती उपलब्ध करुन दिल्या आहेत: स्व-सर्वेक्षण आणि सहाय्यित सर्वेक्षण.

लाभार्थी स्वतः https://pmayg.nic.in/netiay/Home/home.aspx या संकेतस्थळावर किंवा आवास प्लस 2024 मोबाइल ॲपद्वारे सर्वेक्षण करु शकतात. याशिवाय, ग्रामपंचायत अधिकारी आणि अधिकृत सर्वेक्षक त्यांच्या आधार क्रमांकाने लॉगिन करुन पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण करतील. लाभार्थ्यांनी सर्वेक्षण करताना अचूक माहिती भरणे आवश्यक आहे.

तरी तालुक्यातील नागरिकांनी घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी लागणारा सेल्फ सर्व्हे पूर्ण करुन घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांनी केले आहे.

----------------------------------------

संस्थांच्या निवडणुकांमध्ये ताकदीने उतरुन वंचित समाजाला प्रतिनिधित्व मिळवून द्यावे.”उपस्थित मान्यवर:सचिन भाऊ उजगरे – उपाध्यक्ष, बीड जिल्हा,अजय सरवदे – जिल्हाध्यक्ष, बीड पश्चिम,खंडू जाधव – महासचिव, बीड पश्चिम,प्रसन्नजीत रोडे – उपाध्यक्ष, बीड पूर्व,संजय नाकलगावकर – माजी तालुकाध्यक्ष, माजलगाव,लखन काका जोगदंड ,हनुमंत वाघमारे – अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, परळी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन गौतम भाऊ साळवे (तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी – परळी) यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजेश सरवदे (तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन युवा आघाडी – परळी) यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शवला.

--------------------------------------

या उपक्रमाला विद्यार्थ्यांसोबतच पालकांचाही भरभरुन प्रतिसाद लाभला. आपल्या मुलांनी घरी जाऊन आजचा अनुभव आनंदाने सांगितल्यावर पालक भारावून गेले. “आजचा दिवस आमच्या मुलांच्या आयुष्यात संस्मरणीय ठरला,” अशी प्रतिक्रिया काही पालकांनी दिली.

या दिवशी शिक्षकांनी मार्गदर्शक आणि सहकाऱ्यांची भूमिका बजावत विद्यार्थ्यांबरोबर वेळ घालवला. वर्गात प्रेरणादायी, संवादात्मक आणि मुक्त वातावरण निर्माण करत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव, सर्जनशीलता आणि सांघिक भावना जोपासण्यावर भर दिला.

‘आनंददायी शिक्षण’ ही संकल्पना संस्कार प्राथमिक शाळेत यशस्वीरित्या साकार होत असून, परळीतील इतर शाळांसाठीही ती एक प्रेरणा ठरत आहे.

----------------------------------------

मारुन मेटाफुटीला आलेले आहेत. सि.ओ.अंधारे मॅडम यांनी दोन ते तीन दिवसात सह्या करुन धनादेश घरकुल धारकांना वाटप नाही केल्यास सर्व घरकुल धारकांना सोबत घेवुन न.प. बीडला टाळे ठोकण्यात येईल. काही अनुचीत प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. अशा स्वरूपाचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना अशोक वीर यांनी दिले आहे.

--------------------------------------

भारतातील 16 लाख विद्यार्थ्यांमधून 17 हजार विद्यार्थ्यांमध्ये आपली रँक निर्माण करुन चि.वेदांत काळे याने अथक परिश्रम व जिद्दीने हे यश संपादन केले आणि परळी नगरीच्या मुकुटामध्ये मानाचा तुरा रोवला.

अशा या अद्वितीय यशाबद्दल दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी चि.वेदांत काळे व त्याचे आई वडील सौ दिपाली काळे ,श्री नरेश काळे यांचे अभिनंदन केले त्याचबरोबर चि. वेदांत यास पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभाशीर्वाद देऊन *असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास* हा रामदास स्वामींचा मूलमंत्रही दिला.

-----------------------------------------

युनुस, सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार , शेख मुस्ताक, शेख मुबीन,अशोक येडे,रामधन जमाले यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावेळी रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांनी “लवकरच कारवाई होईल” असे आश्वासन दिले होते. मात्र साडेपाच महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आता पुल पाडण्याचे काम सुरु असून, सामाजिक कार्यकर्त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

दि.5 फेब्रुवारी रोजी खा.बजरंग सोनावणे व आ.संदीप क्षीरसागर यांनी पालवण फाटा पुलाची प्रत्यक्ष पाहणी करून आंदोलनकर्त्यांची भेट घेतली होती. त्यांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांशी चर्चा करून कारवाईसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, “या विषयावर लोकप्रतिनिधींनी मुग गिळून गप्पच राहणे निंदनीय आहे,” अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

----------------------------------------

अभियान,25 जुलै रोजी गरजुना ब्लॅकेट वाटप, अल्पोहर, 26 जुलै रोजी प्रभु श्री वैद्यनाथास रुद्राभिषक आसे वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमात सहभागी होऊन लाभ घ्यावा आसे आव्हान भाजपा विद्यार्थी आघाडी चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मुंडे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष चेतन्य मुंडे, भाजपचे युवक नेते पप्पन गोलेर, नारायण गुट्टे, सुरज चाटे, मुंजा फड,ओंकार फड, सुमंत मुंडे,प्रकाश रोडे ,बालाजी गुट्टे ,नकुल वाघमोडे,ओंकार गित्ते,दिनेश आंधळे, श्याम मुंडे, आत्माराम मुंडे,विराज गित्ते , धनंजय आंधळे यांनी केले आहे.

-----------------------------------

मोदी यांच्या शिफारशीनुसार तसेच आमदार धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव आदमाने यांना अंबाजोगाई शहराच्या अध्यक्ष पदाची जवाबदारी सोपवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोचविण्यासाठी आदमाने हे प्रयत्न करतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या अत्यंत जवळचे शांत, संयमी, सतत हसतमुख, सामाजिक कार्यात तन-मन-धनाने अहोरात्र अग्रेसर असणारे वेळ प्रसंगी कठोर भूमिका घेणारे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते महादेव आदमाने यांच्यावर शहराध्यक्ष पदाची जवाबदारी टाकली आहे.

पक्षश्रेष्ठींनी टाकलेली जवाबदारी अत्यंत निष्ठेने सांभाळून पक्षवाढीसाठी तसेच सामान्य नागरिकांच्या हितासाठी आपण काम करणार असल्याचे यावेळी नवनिर्वाचित शहर अध्यक्ष महादेव आदमाने यांनी सांगितले. कॉलेज जीवनापासूनच प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष केला असून बिकट परिस्थितीत देखील अबालवृधासाठी लढा उभा केला आहे. रस्त्यावरील सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून चळवळीत आपले जमेल तसे योगदान देऊन हातभार लावला आहे. त्यामुळेच जनतेने माझ्या कुटुंबात नगरसेवक पद दिले आहे. सर्वसामान्य व्यक्तींना केंद्रबिंदू मानून 80 टक्के समाजकारण 20 टक्के राजकारण करत आपण गोरगरीबांना न्याय मिळवून देत , समाज विघातक शक्तींना रोखण्याचे काम करू असा शब्द देखील आपल्या निवडीबद्दल महादेव आदमाने यांनी दिला आहे.

---------------------------------------------

लोककवी लेखक शाहीर म्हणून महत्त्वाची भूमिका केली. आण्णा भाऊंचे लेखन सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. अण्णाभाऊ साठे खऱ्या अर्थाने मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारसरणीचे होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांची महत्त्वाची भूमिका असून सर्वसामान्य गोरगरीब दुबळ्या अनाथ आणि वंचित घटकांना प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी निर्माण केलेले साहित्य हे सुवर्ण अक्षराचे मोती होते असा गौरव ही डॉ. सुधाकर चव्हाण यांनी केला.

लाल बावटा कला पथकाचे कार्यक्रम!

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी लाल बावटा कला पथकाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून तत्कालीन काळात जनजागृती, प्रबोधन करून परिवर्तनाची नवी दिशा सर्वसामान्य माणसाला दिली. आजही अनेक विद्यार्थी अभ्यासक म्हणून अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. मराठीत 35 कादंबऱ्या, फकीरा हे गाजलेले साहित्य, तर नाटक, पटकथा पोवाडा, गाणी या मधूनही त्यांनी समता आणि बंधुत्वाची अपेक्षा केली.

-----------------------------------------

सक्षमपने सांभाळून शहरामध्ये भाजपाचे संघटन कार्यकर्ते मजबुत करून पक्षाचा विस्तार करून दाखऊ असे नवनिर्वाचित्त अंबाजोगाई शहराच्या भाजपाच्या कोषाध्यक्ष पदी निवड झालेले मा श्री सत्यप्रेम इंगळे बोलत होते

---------------------------------------------

असा प्रश्न उपस्थित होत आहे टाकळी देशमुख गावात मागील काही दिवसात रस्ता अडवणूक बोगस विहिरी अशा घटना घडून ही यावर तत्काळ कारवाही करण्यात यावी अशी मागणी वारंवार होऊन प्रशासन मात्र गावकऱ्यांच्या या मागणीला केराची टोपली दाखवताना दिसत आहे वरील विहिरीची चौकशी पुढील 8 दिवसात न झाल्यास गावकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल यास पूर्णपने प्रशासन जबाबदार असेल असे टाकळी देशमुख येथील गावकऱ्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे .

------------------------------------------

तालुकाध्यक्ष शिवकन्या रांदड, तालुका युवा संघटना अध्यक्ष किरण भन्साळी, माहेश्वरी युवा जिल्हाध्यक्ष रोहन मुंदडा, बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण तोष्णीवाल, माहेश्वरी महिला जिल्हा अध्यक्ष पुनम जाजु, ललित बजाज, प्रितम तापडिया, दिपा धुत, उमा बजाज, दीपा भंडारी, दत्तप्रसाद लोहिया, सतीश तोष्णीवाल, जगदीश जाजु यांच्यासह 200 भाविकांनी सहभाग घेतला.

# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद.

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे.चंद्रशेखर आझाद यांचा जन्म 23 जुलै 1906 ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. 13 एप्रिल 1919 रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला.त्यानंतर चंद्रशेखर आझाद 1920 मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या 15 व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला 12 फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले.तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता 1922 साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते. दिनांक 27 फेब्रुवारी 1931 रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरु हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले.आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले. अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता.आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण, भ्रष्टाचार,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना करावा लागतो आहे.आज 140 करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.यामुळे हा पैसा 140 कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत.यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

हॅलो बीड संघर्षनेता
मंगळवार दि. 22 जुलै 2025



# पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली
## बीड जिल्ह्यात कापूस, सोयाबीनची सर्वाधिक लागवड



बीड, :- मराठवाड्यामध्ये अजूनही दमदार पाऊस झाला नाही. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली. गेल्या दोन तीन दिवसामध्ये मध्यम आणि तुरळक स्वरुपाचा पाऊस पडल्यामुळे पिकांना काही प्रमाणात जिवदान मिळाले. हा पाऊस जिल्ह्यात नाही तर तालुक्या पुरताच पडला आहे. रात्री बीड तालुक्यासह इतर ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या सरी पडल्या. आष्टी, पाटोदा, केज, व गेवराईचा काही भागासह इतर ठिकाणची पिके सुकू लागली आहेत. जिल्ह्यात या वर्षी सोयाबीनची सर्वाधिक लागवड झाली या नंतर कापसाची लागवड झालेली आहे.बीड जिल्ह्यामध्ये खरीपाचे 8 ते 8.50 लाख क्षेत्र आहे. यात सर्वाधिक पेरा पुर्वी कापसाचा होत होता. मात्र गेल्या तीन ते चार वर्षापासून कापसाचे क्षेत्र घटू लागले. सोयाबीनचा सर्वाधिक पेरा जिल्ह्यात होत आहे. यावर्षी तीन ते साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची लागवड झाली तर 2 ते 2.50 लाख हेक्टरमध्ये कापसाची लागवड झाली. इतर क्षेत्रात मुग, तुर, बाजरी, सुर्यफुल, भुईमुगाची लागवड करण्यात आली. जुन महिन्या चांगला पाऊस पडला. मात्र जुलै महिन्यात पावसाने दडी मारली. गेल्या 30 ते 35 दिवसापासून मराठवाड्यामध्ये पान 3 वर

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे पूर्ण करून घ्यावा-संजय मुंडे

### » प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-2 सर्व्हेक्षणसाठी 31 जुलै 2025 पर्यंत मुदतवाढ



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- परळी तालुक्यातील घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी लागणारा सेल्फ सर्व्हे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांनी केले आहे. यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-2 सर्व्हेक्षणसाठी 31 जुलै 2025 पर्यंत मुदतवाढ देणात आली आहे. तरी गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः ॲपवरुन आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी 31 जुलै अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. 31 जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल ॲपद्वारे पान 3 वर

## या कार्यालयातून वंचित, शोषित, पीडित, उपेक्षितांना न्याय मिळेल- शैलेश भाऊ कांबळे (जिल्हाध्यक्ष, बीड)

### वंचित बहुजन आघाडी व युवा आघाडीच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचे परळीत उद्घाटन



परळी शहरात वंचित बहुजन आघाडी व युवा आघाडीच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पडले. सामाजिक न्यायाच्या दिशेने भक्कम पावले टाकण्यासाठी हे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी एक प्रेरणास्थान ठरणार आहे.

उद्घाटनाचा मान वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश भाऊ कांबळे व जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या हस्ते झाला.शैलेश कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "प्रत्येक पदाधिकाऱ्याने वंचित घटकांच्या सुखदुःखात सहभागी व्हावे आणि आगामी स्थानिक स्वराज्य पान 3 वर

## आनंददायी शिक्षणातूनच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो.– श्री. दीपक तांदळे

### » संस्कार प्राथमिक शाळेत 'दप्तरमुक्त शाळा' उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली नवी ऊर्जा!




परळी (प्रतिनिधी) – शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा येथे संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे यांच्या संकल्पनेतून 'दप्तरमुक्त शाळा' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली शालेय दप्तरं घरी ठेवून सर्जनशील, अनुभवाधिष्ठित आणि आनंददायी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये कविता गायन, संवाद सादरीकरण, चित्रकला, हस्तकला, इंग्रजी टंग ट्विस्टर्स, शब्दकोडी, कथाकथन, खेळ यांसारख्या विविध क्रियाकलापांचा समावेश होता.

**शाळेच्या 'आनंददायी शिक्षण' उपक्रमाचे परळीकरांकडून विशेष कौतुक**

शाळेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शिक्षणाला आनंददायी रूप देत विद्यार्थ्यांवरील दप्तराचे ओझे कमी करणे, हे प्रशासनाने स्पष्ट केले. पारंपरिक अध्यापन पद्धतींमधून बाहेर येत, शिक्षकांनी सहभागात्मक व खेळत शिकण्याच्या माध्यमातून अध्यापन केले. यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, संवादकौशल्य, कलागुण आणि सर्जनशीलता बहरली. पान 3 वर

## घरकुल धारकांना धनादेश वाटप करा, अन्यथा बीड न.प.ला टाळे ठोकू - अशोक वीर



बीड प्रतिनिधी - बीड शहरातील घरकुल धारकांना दोन ते तीन दिवसात घरकुलाचे धनादेश न मिळाल्यास न.प. ला टाळे ठोकणार, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भावनाचे प्रणेते तथा बहिरवाडी चे माजी अशोक वीर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे. मार्च महिन्यात नवीन घरकुल साठी फंडा आला आहे, 3 ते 4 महिने झाले घरकुलाची यादी मंजुर व प्रसिध्द करुन, फलकावर लावण्यात आलेली आहे. बजेट पण आहे तरी पण ऐन पावसाळ्यात घरकुल धारकांनी घराचे बांधकामे सुरु केलेले आहेत. परंतु न.प.सिओ यांना सध्या सह्या करायला वेळ नाही म्हणुन बीड शहरातील घरकुल धारक न.प. मध्ये चकरा मारुन पान 3 वर

## IIT इंजीनियरिंग साठी निवड झाल्याबद्दल डॉ.संतोष मुंडे यांच्या हस्ते चि.वेदांत काळे याचा सत्कार.




परळी (प्रतिनिधी):दिनांक 22 जुलै.

परळीचा सुपुत्र चि.वेदांत नरेश काळे याची IIT (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) इंजिनिअरिंग साठी IIT भुवनेश्वर ओडीसा या ठिकाणी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांच्या हस्ते त्याचा श्रीनाथ हॉस्पिटल परळी येथे सत्कार करण्यात आला. यावेळी वेदांत काळे चे पालक नरेश काळे तसेच माजी सरपंच हरीश नागरगोजे व त्यांचे सहकारी उपस्थित होते

राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या JEE मेन व JEE अडव्हान्स परीक्षेत पान 3 वर

## जनतेच्या पैशांचा धुराळा, दोषींवर कारवाईसाठी रेल्वे सुरक्षा आयुक्तांची टाळाटाळ - डॉ. गणेश ढवळे

### ➲ चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरुवात!




बीड / प्रतिनिधी अहिल्यानगर–बीड रेल्वेमार्गावरील चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथे पावणे तीन कोटी रुपये खर्चून उभारलेला रेल्वेपुल लोहमार्ग व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असून आता तो पाडण्याचे काम जोमाने सुरु आहे. या प्रक्रियेत जनतेच्या करातून शासनाकडे जमा झालेल्या निधीचा प्रचंड अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित अभियंता, ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून शासन तिजोरीत नुकसानभरपाई जमा करावी, या मागणीसाठी दि.5 फेब्रुवारी रोजीच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, शेख पान 3 वर

## लोकनेत्या महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प सप्ताह चे आयोजन

### » जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हा--ज्ञानेश्वर मुंडे



प्रतिनिधी (परळी) भारतीय जनता पक्षा च्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्या च्या पशुसंवर्धन, पर्यावरण वातावरण बदल मंत्री मा.ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षा प्रमाणे या वर्षी ही सामाजिक बांधिलकी म्हणून सेवा संकल्प सप्ताह चे आयोजन करण्यात आले आहे.

यात दि. 20/07/2025 रविवार रोजी वैद्यनाथ महाविद्यालय परळी वैजनाथ येथे वृक्षारोपण करून सेवा संकल्प सप्ताहला सुरुवात करण्यात आले, 21जुलै रोजी कण्हेरवाडी येथे ई श्रम कार्ड वाटप ,22 कामधेनु गोशाळा शारदानगर येथे गाईं ना चारा, 23 जुलै रोजी वैद्यनाथ महाविद्यालय येथे रक्त गट तपासणी शिबीर, 24जुलै रोजी,सोमेश्वर मंदीर जिरेवाडी येथे मंदिर स्वच्छता पान 3 वर

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी महादेव आदमाने याची नियुक्ती


### पक्षाने दिलेली जवाबदारी निष्ठेने संभाळून पक्षवाढीसाठी प्रयत्न करणार :– महादेव आदमाने



अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते माजी सभापती महादेव आदमाने यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री धनंजय मुंडे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपालीताई चाकणकर, युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार संजय दौंड,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बबनभैया लोमटे यांच्या उपस्थिती मध्ये महादेव आदमाने यांना त्यांच्या निवडीचे नियुक्तिपत्र देण्यात आले. महादेव आदमाने यांच्या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत.

महादेव आदमाने यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राजकिशोर पान 3 वर

## अण्णाभाऊसाठे यांचे साहित्य परिवर्तनाची दिशा देणारे - डॉ. सुधाकर चव्हाण



बीड / प्रतिनिधी महाराष्ट्राच्या जडणघडणीत साहित्याचे योगदान अनन्यसाधारण आहे, किंबहुना समाज सुधारक, लोककवी, लेखक, शाहीर यांची भूमिका तितकीच महत्त्वाची ठरलेली आहे. या दृष्टीने अण्णाभाऊ साठेंचे सबंध साहित्य हे परिवर्तनाची दिशा आणि चालना देणारे आहे! असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुधाकरराव चव्हाण यांनी मांडले.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने माध्यमांशी बोलताना डॉ. सुधाकरराव चव्हाण म्हणाले, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी समाज सुधारक पान 3 वर




## मुंदडा घराण्याचे एकनिष्ठ असणारे श्री सत्यप्रेम इंगळे यांची अंबाजोगाई शहराच्या कोषाध्यक्ष पदी निवड सर्वत्र अभिनंदन



अंबाजोगाई ( बाबुराव तिडके )

अंबाजोगाई शहरामध्ये भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करुन जंम्बो संघटन भाजपाने तयार केले गेल्या अनेक वर्षांपासून मुंदडा घराण्याशी एकनिष्ठ असणारे व सोशल मीडियाच्या माध्यमातून केज विधानसभेच्या आ नमिताताई मुंदडा यांनी केलेल्या विकास कामांची माहिती मतदार संघातील शेवटच्या माणसा - पर्यंत पोहचवण्याचे काम श्री सत्यप्रेम इंगळे यांनी केलेले आहे ज्येष्ठ नेते श्री नंदकिशोरजी मुंदडा श्री अक्षय मुंदडा तालुका अध्यक्ष श्री गोकुळ कदम शहराध्यक्ष मा श्री संजय ( भैय्या ) गंभिरे यांच्या नेतृत्वाखाली त्यांची अंबाजोगाई शहराच्या भाजपाच्या कोषाध्यक्ष पदी निवड झाली असता त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे मंत्री ना पंकजाताई मुंडे आ नमिताताई मुंदडा आमचे नेते श्री नंदकिशोरजी मुंदडा श्री अक्षय ( भैय्या ) मुंदडा यांच्या नेतृत्वाला शोभेल असे काम करुन दाखऊ व माझ्यावर सोपवलेली जबाबदारी पान 3 वर

## परळी तालुक्यातील मौजे टाकळी दे. येथील दोन विहीर चोरीला

### चौकशीची मागणी करून ही चौकशीस अधिकरी यांची टाळाटाळ

परळी वै. ( प्रतिनिधी) : परळी तालुक्यातील टाकळी देशमुख गावातील दोन जलसिंचन विहिरी चोरीला गेल्याची खळबळ जनक घटना महिन्या भरा पूर्वी समोर आली असून सदर विहिरी फक्त पैसे लाटण्यासाठी कागदावरच बनवल्या की काय असा सवाल गावकरी उपस्थित करत आहेत

सदरील घटना समोर येताच गावकऱ्यांनी गटविकास अधिकारी साहेब यांच्याकडे निवेदना द्वारे पाठपुरावा करून चौकशीची मागणी केली असता चौकशीस येण्यासाठी जी.प. कर्मचारी दिवसेंन दिवस टाळाटाळ करत आहेत असा आरोप गावकऱ्यांच्या वतीने होत आहे त्यामुळे सदरील विहिरीच्या भ्रष्टाचारा मध्ये अधिकारी व कर्मचारी ही भागीदार आहेत की काय पान 3 वर

## अंबाजोगाई ते परळी वैजनाथ पदयात्रा संपन्न



अंबाजोगाई (प्रतिनिधी) : अंबाजोगाई येथील माहेश्वरी महिला संघटन, युवा माहेश्वरी संघटनेच्या वतीने श्रावण मास निमित्त रविवार दिनांक 20 जुलै रोजी अंबाजोगाई ते परळी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

येथील संत भगवान बाबा चौकातून या पदयात्रेला सुरुवात झाली. वाटेत भाविकांच्या चहापाण्याची सोय जयप्रकाश भुतडा तर नाष्ट्याची सोय ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांच्या वतीने करण्यात आली. परळी वैजनाथ येथे वैद्यनाथाचे दर्शन घेतल्यानंतर जगदीश तोष्णीवाल, संदीप चिद्रवार, श्रीकांत दहातोंडे, परळी तालुका माहेश्वरी महिला संघटन यांच्या वतीने भाविकांना सरबत, केळी व फराळाचे वाटप करण्यात आले. भाविकांच्या भोजन व परतीच्या प्रवासाची सोय अंबाजोगाई तालुका महेश सेवा संघाच्या वतीने करण्यात आली. या पदयात्रेत माहेश्वरी महिला पान 3 वर